
YASHWANT Institute Estd.1995
विद्यार्थी हिताय, पालक सुखाय
BALAJI NAGAR | NARHE



# आई ऽऽऽ◆◆◆

## कशीयेस गं तू ?

माझ्या जन्मापासून ते आजपावेतो पहिल्यांदाच तुझी खुशाली विचारतोय ना ? आम्हाला त्रास नको म्हणून कित्येकदा तुला बरं नसताना "मला काय धाड भरलीये" असं म्हणत काम रेटत राहणारी तू ! तू मजेतच असणार हे जणू गृहितच धरलंय मी.

निमित्त मदर्स डे चे असेल, पण आई आज मला जाणवतंय, नऊ महिने मी तुझ्या पोटात असल्यापासून अगदी या क्षणापर्यंत आमच्यासाठी आनंदाने खस्ता खाणारी तू, आमच्या सुखासाठी स्वतःचे दुःख विसरणारी तू, आमच्या चुका पदरात घेवून मायेचा वर्षाव करणारी तू, आयुष्यभर काळजीनं आमचंच करत राहणारी तू, आमच्याच साठी झिजताना कसलीही तक्रार नसलेली तू.

आणि मी ?
तुझ्या झिजण्याची परतफेड तुझ्यावरच चिडून करणारा मी,
तुझ्या काळजी करण्याला “काय गं सारखी कटकट” म्हणून तुझ्यावर ओरडणारा मी, तुझ्या मायेला, तुझ्या प्रेमाला सतत अपमानित करणारा मी, तुला ही दुःख असेल, त्रास होत असेल याची कल्पनाही नसणारा मी, तुझ्या त्यागाला, तपस्येला "तुला काही कळत नाही" असं म्हणून हिणवणारा मी, माझ्या आयुष्याला आकार देणारी तू, संस्कार देणारी तू , पण त्याची किंमत नसलेला मी.

आज का कोणास ठाऊक पण मला महाराजांची आणि जिजाऊंची तीव्रतेने आठवण आली. वाटलं, शिवबा कधी जीजाऊंशी असा अभद्र वागला असेल का ? अपमान तर सोडाच, पण साधं आवाज वाढवून तरी बोलला असेल का तो जिजाऊंशी ? माझ्या राजानं कध्धी तरी त्याच्या आईला दुखावलं असेल का ?

लाज वाटते आहे माझ्या वागण्याची. माफ करशील का गं मला ?
आई, आजपासून तू माझी जिजाई आणि मी तुझा शिवबा होणार.
भरपूर अभ्यास करून मी ही माझ्या करीयरचे स्वराज्य निर्माण करणार.
आणि तुझं नाव लावून मी अभिमानाने मिरवणार!

# ॥ मातृ नाम प्रथम ॥

संकल्पना आणि रचना :
शीतल नलिनी आदगौडा पाटील
संस्थापक, संचालक
यशवंत इन्स्टिट्यूट | टाकळकर क्लासेस